| | |
|---|---|
| **MHPU200015822024** | <u>नियमित फौजदारी खटला क्र. २८९/२०२४</u><br><u>महाराष्ट्र शासन</u><br><u>वि.</u><br><u>ओमकार रामकिसन गायकवाड</u> |

<u>निशाण १४ वर आदेश पारीत</u>

**१.** अर्जदार ओमकार रामकिसन गायकवाड यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४५७ प्रमाणे शिरुर पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं. ३९९/२०२४ या गुन्हयामध्ये जप्त केलेली Splender Plus दुचाकी वाहन रजि.नंबर MH.12-WM-3844 चेसिस नं. MBLHAW220R5A85488 इंजिन नं. HA11E7R5A01079 हिचा ताबा मिळण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

**२.** अर्जदाराच्या कथनानुसार Splender Plus दुचाकी वाहन रजि.नंबर MH.12-WM-3844 चेसिस नं. MBLHAW220R5A85488 इंजिन नं. HA11E7R5A01079 हि मालकीची व दैनंदिन वापरातील असून सदरचे चारचाकी वाहन पोलीस स्टेशनमध्ये पडून राहिलेस अर्जदार यांची गैरसोय होणार आहे. अर्जदार याने सदरची दुचाकी ही त्याचे मालकीची आहे हे दाखविण्यासाठी आवश्यक ती सर्व कागदपत्रे अर्जदारने याकामी दाखल केलेली आहेत.

**३.** सदर अर्जामध्ये तपासी अंमलदार यांनी आपले म्हणणे देवून जप्त वाहन हे महत्त्वाचा पुरावा असुन परत देण्यास हरकत असल्याचे सांगितले आहे. तसेच सहा. सरकारी अभियोक्ता यांनी आपले म्हणणे देवून असे कथन केले आहे की, अर्जदाराच्या मालकीची पडताळणी करुन योग्य त्या अटी व शर्तीवर मोबाईल परत देण्यास हरकत नसल्याचे कथन केले आहे.

**४.** अर्जदार तर्फे वकील यांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदाराने सदर केस कामी सदर वाहनाची आर.सी.बुक, अर्जदाराच्या पॅन कार्डची प्रत, गुरनं. ३९९/२०२४ ची FIR ची प्रत इत्यादी कागदपत्रे दाखल केलेली आहेत. सादर केलेल्या कागदपत्रांवरुन सदरची Splender Plus दुचाकी वाहन रजि.नंबर MH.12-WM-3844 चेसिस नं. MBLHAW220R5A85488 इंजिन नं. HA11E7R5A01079 ही अर्जदारच्या मालकीच्या असल्याचे दिसून येते. त्यामुळे ***<u>मा. सर्वोच्च न्यायालयाचा न्यायनिर्णय सुंदरभाई विरुध्द गुजरात सरकार, एआयआर २००३ एससी ६३८</u>*** मधील गुणोत्तरानुसार अर्जदार यांची जप्त केलेले वाहन ही पोलिस स्टेशनला पडून राहिल्यास खराब होणार आहे. त्यामुळे जप्त केलेला वर नमुद

मुद्देमाल काही अटी व शर्तींवर सदरील मालमत्ता अर्जदाराच्या ताब्यात देणे योग्य होईल. म्हणून खालील आदेश पारित करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. शिक्रापुर पोलीस ठाणे रजि.नं.३९९/२०२४ मध्ये जप्त केलेली Splender Plus दुचाकी वाहन रजि.नंबर MH.12-WM-3844 चेसिस नं. MBLHAW220R5A85488 इंजिन नं. HA11E7R5A01079 हे चारचाकी वाहन अर्जदार यांच्या ताब्यात रक्कम रुपये ५०,०००/–(पन्नास हजार रुपये फक्त) चे हमीपत्र दिल्यानंतर देण्यात यावे.

३. अर्जदारने सदरची मोटरसायकल/दुचाकी यांच्या मध्ये सदर प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपर्यंत त्रयस्थ इसमाचा हक्क किंवा अधिकार निर्माण करु नये.

४. अर्जदारने प्रकरणाच्या चौकशीसाठी सदर मोटरसायकलची/दुचाकीची आवश्यकता असल्यास ती न्यायालयापुढे हजर करावा.

५. अर्जदाराने सदरच्या मोटरसायकलचे/दुचाकीचे सर्व बाजूने चार फोटो काढून सदर मुद्देमालाचा ताबा मिळाल्यापासून सात दिवसांचे आत दाखल करणेचे आहेत.

६. अर्जदारने सदरची मोटरसायकलमध्ये /दुचाकीमध्ये कोणत्याही प्रकारचा फेरफार अगर बदल करायचा नाही.

७. सदरची मोटरसायकल/दुचाकीचा कोणत्याही गुन्हयात वापर झाल्यास व गुन्हा दाखल झाल्यास आदेश त्याच वेळी रद्द होईल.

८. सदरचा आदेश पोलीस ठाणे शिक्रापुर यांना कळविण्यात यावा.

SANJAY DIGAMBERRAO WANKHEDE

Digitally signed by SANJAY DIGAMBERRAO WANKHEDE
Date: 2025.06.21 11:45:09 +0530

**शिरुर**
दिनांक – २१/०६/२०२५

**(संजय दि. वानखेडे)**
न्यायदंडाधिकरी प्रथमवर्ग
घोडनदी, शिरुर, जि. पुणे